श्री भैय्याजी पांढरीपांडे
नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क
हनुमान नगर, नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना
# नियमित कार्यक्रम अहवाल

डॉ. एल.एस.तुळणकर
प्राचार्य

डॉ. विलास घोडे
कार्यक्रम अधिकारी रासेयो

## २०१७–२०१८

# <u>बी. पी. नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क,</u>
# <u>हनुमान नगर, नागपूर–9</u>
## <u>*राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम अहवाल (2017–18)*</u>

बी. पी. नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क मधील राष्ट्रीय सेवा योजना पथका अंतर्गत या शैक्षणिक सत्रमध्ये एकूण १०० स्वयंसेवक सहभागी झालेले आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये विविध खालीलप्रमाणे उपक्रम आणि कार्यक्रम राबविण्यात आले.

दि. ५ ऑगस्ट २०१७ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकाकडून भारत स्वच्छता अभियानांतर्गत श्रमदानाचा कार्यक्रम महाविद्यालय परिसरात आयोजित करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुळणकर, डॉ. बरडे, डॉ. बारहाते, डॉ. घोडे आणि महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १२ ऑगस्ट २०१७ ला  युवा दिन निमित्त्याने ' आजचा युवा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. १२ सप्टेंबर २०१७ ला Carrier Guidance अंतर्गत महाविद्यालयात 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले.

दि. १६ सप्टेंबर २०१७ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकांची निवड करण्यासाठी नोंदणी व उद्बोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.  तसेच स्वयंसेवकांचे पंजीकरण करण्यात आले.

दि. २६ सप्टेंबर २०१७ ला राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त्याने ' व्यक्तीमत्व विकास' या विषयावर शहर समन्वयक प्रा. अनिल बनकर यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले.  या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे  स्वयंसेवक , महाविद्यालयातील प्राचार्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

दि. २ ऑक्टोंबर २०१७ ला 'महात्मा गांधी जंयती' निमित्त्याने Center for Sustainable Development आणि नागपूर महानगर पालीका यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वच्छता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी रा.स.यो. चे संचालक  डॉ. केशव वाळके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर, डॉ. बारहाते आणि महानगरपालीका कर्मचारी उपस्थित होते. या रॅलीमध्ये चार महाविद्यालयाने सहभाग घेतलेला होता. आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक असे एकुण २०० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

दि. २६ नोव्हेंबर २०१७ ला 'संविधान दिन' निमित्त्याने सामाजिक न्याय विभागाच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी मा. जिल्हाधिकारी श्री. सचिन कुर्वे, मा. प्रा. जोगेंद्र कवाडे , मा. सुधाकर कोहळे आणि प्रादेशिक आयुक्त मा.श्री. सिध्दार्थ गायकवाड साहेब आणि अन्य मान्यवर मोठया संख्येने

उपस्थित होते. या रॅलीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वयंसेवकाची भूमिका पार पाडली. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

दि. २८ नोव्हेंबर २०१७ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा आयोजित ‘ मनुष्य श्रेष्ठता’ या विषयावर देशपांडे सभागृह येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील १० विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. ३० नोव्हेंबर २०१७ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा जागतिक एड्स दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांनी सहभागी घेतला.

दि. ६ डिसेंबर २०१७ ला दूपारी १२.०० वा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६१ महापरिनिर्वाण दिनानिमित्याने रासेयो पथकाद्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून डॉ. आंबेडकराच्या विचारांवर प्रकाश टाकण्यात आला. महाविद्यालयातील डॉ. बारहाते आणि अन्य कर्मचारी व विद्यार्थी या प्रसंगी उपस्थित होते.

दि. ३ जानेवारी २०१८ ला सावित्रीबाई फुले जंयतीनिमित्त्याने महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयातील वरीष्ठ प्राध्यापिका डॉ. नंदा पांगुळ यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी त्यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट मुलांसमोर व्यक्त केला.

दि. १४ ते २० जानेवारी २०१८ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष ग्रामिण शिबिर बोरगांव (कलांद्री) तह. उमरेड, जि. नागपूर या ठीकाणी आयोजित करण्यात आला. या शिबिरामध्ये स्वच्छता, अभियान,



अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती, हगणदारीमुक्त, आरोग्य, शेतकरी आत्महत्या, महिला सक्षमीकरण, वृक्षसंवर्धन अश्या विविध सामाजिक उपक्रम राबविल्या गेले. महाविद्यालयातील १०२ विद्यार्थी आणि कार्यक्रम आधिकारी डॉ. विलास घोडे, डॉ. नंदा पागूंळ आणि श्री. मोहन धापोडकर या शिबिरामध्ये सहभागी झाले होते.

दि. २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत गोंडवाना विद्यापीठद्वारा सरदार पटेल महाविद्यालय,चंद्रपुर येथे राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे आयोजित शिबिरात महाविद्यालयातील एम.एस.डब्ल्यु चे श्री . योगेश बोभाटे आणि श्री. सुमित लहाने हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. ०१ ते ०८ फेब्रूवारी २०१८ या कालावधीत शिवप्रसाद सदानंद जयस्वाल महाविद्यालय, अर्जुन मोरगांव यांच्याद्वारे राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये महाविद्यालयातील श्री. अमोल राठोड, अंजली दोन्तुल हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. ६ फेब्रूवारी २०१८ सकाळी ९.०० वा रा.से.यो. पथकांने महाविद्यालयाचे संस्थापक स्व. ईश्वरबाबू देशमुख यांच्या बाराव्या स्मृती दिनानिमित्याने जीवनज्योती रक्तपेढी, नागपूर यांच्या सहकार्याने महाविद्यालयात रक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी नागरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रमेशजी दुरगकर, सस्थेचे सचिव डॉ. अरूणजी देशमूख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर, डॉ. बारहाते यांनी बाबुजींच्या प्रतिमेला माल्र्यापण केले.




महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करून रक्तदान शिबिराला सुरूवात केली. महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. विलास घोडे, डॉ. रेखा जगनाडे, शुभांगी टुले इ. कर्मचारी आणि महाविद्यालयातील २७ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

दि. १०ते १६ फेब्रूवारी २०१८या कालावधीत  धनवटे नॅशनल कॉलेज , बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालय, तायवाडे कला व वाणिज्य  महाविद्यालय कोराडी यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे आयोजित शिबिरामध्ये महाविद्यालयातील श्री. सुमित लहाने, रंजना मिरे, सागर तेलतुंबडे व किशोर कुटे हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. १२फेब्रूवारी २०१८ ला ममता हेल्थ इन्स्टिट्यूट फॉर मदर एन्ड चाईल्ड या संस्थेद्वारे आंतर महाविद्यालयीन कौशल्य स्पर्धा, युवक आणि व्यसन यावर आधारित मातृसेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.  या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील योगेश बहाते, सुमित लहाने, प्रियंका वानखेडे, कोमल सरगर, दिपाली भानरेकर, सुजाता रहांगडाले, राजश्री जांभुळकर, नंदकिशोर धाडसे, श्रीकांत वाघमारे या विद्यार्थ्यांनी पथनाटय सादर करून प्रमाणपत्र मिळविले.

दि. १४ फेब्रूवारी २०१८ ला कृषक समाज बहुउद्देशिय संस्था व काजवा यांच्या संयुक्त विद्यामानाने आयोजित पशुपतीनाथ महोत्सव कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी शेतकऱ्या आत्महत्येवर पथनाटय सादर केले.  या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील १५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. २१ फेब्रूवारी २०१८ महाविद्यालयातील रासेयो  पथकाद्वारे Web Technology & IT या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे वक्ते  श्री. निलेश गुप्ता यांनी Web Technology & IT या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




दि. २७ फेब्रूवारी २०१८ ला महाविद्यालयातील रासेयो पथकाद्वारे  ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त्याने 'मराठीभाषा दिवस' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ. रेखा जगनाळे आणि डॉ. नंदा पांगुळ , डॉ. विलास घोडे व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणि मान्यवरांनी  मराठी मातृभाषे विषयी विचार व्यक्त केले.

दि.५,६,७ मार्च २०१८ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणामध्ये महाविद्यालयातील मनुकुमार साहु, रंजना मिरे, अंकिता सरोदे, अंजली दौन्तुल, श्रीकांत नारनवरे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

दि.७ मार्च २०१८ ला महाविद्यालयातील रासेयो पथक आणि लोकमत  वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमानाने व्यक्तीमत्त्व विकास यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.  या कार्यक्रमाच्या प्रसंगी श्री. सैनी आणि श्री. प्रमोद पारधी यांनी व्यक्तीमत्त्व विकास संबधी मार्गदर्शन केले.

दि. ८ मार्च २०१८ला महाविद्यालयातील रासेयो पथकाद्वारे जागतिक महिलादिन कार्यक्रमाचे  आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्या सौ. निता ठाकरे , महिला सेलच्या संचालीका ॲड डॉ. रेखा बारहाते आणि सौ. साधना थोटे , डॉ. नंदा पांगुळ, डॉ. रेखा जगनाळे व्यासपीठावर उपस्थित होते.  या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महिला आटो चालकांचा सत्कार करून महिलांच्या विविध समस्यांवर मान्यवरांनी प्रकाश टाकला.

दि. १४ एप्रिल २०१८ला महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. महादेवरावजी नगराळे, अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर तसेच डॉ. दिलीप बारहाते व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमप्रसंगी डॉ. बाबासाहेंबाच्या प्रतिमेला प्रमुख पाहूण्यांच्या उपस्थितीत  माल्र्यापण केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नगराळे यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या सामाजिक योगदानावर विचार व्यक्त केले. प्राचार्य तुळणकर यांनीही बाबासाहेबांच्या विचारांवर प्रकाश टाकला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. केशव वालके , श्री. प्रकाश शुक्ला, सौ. बान्ते मॅडम यांनी दिलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल महाविद्यालय आभारी आहे.

डॉ. विलास घोडे<br>कार्यक्रम अधिकारी<br>रा.से.यो पथक

डॉ. एल.एस. तुळणकर<br>प्राचार्य